# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

११ मार्च, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १०/०३/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, बल्लारशाह, रामनगर, दुर्गापुर, पडोली, वरोरा, भद्रावती, शेंगाव, ब्रम्हपुरी, भिसी, चिमुर, मुल, पाथरी, पोंभुर्णा, राजुरा, गडचांदुर, कोरपना, सावली** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **५६** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०९ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **५४,१६,२२०/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---